***पंढरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात, जिल्हा – सोलापूर***

(सौ.प्रिती कुमार (घुले), दिवाणी न्यायाधिश व. स्तर, पंढरपूर यांचे समोर)

*विशेष दिवाणी दावा क्र.: ८७/२०१०*

अनंत प्रभाकर कुलकर्णी ) **वादी**

***विरूध्द***

आप्पाजी ज्ञानेश्वर कुलकर्णी.वगैरे ) **प्रतिवादी**

*मृत्युपत्राचा दुय्यम स्वरुपाचा पुरावा देण्यासाठी परवानगी मिळणेसाठीचा वादीचा अर्ज..*

---

| | | |
|---|---|---|
| वादीतर्फे वकील | : | श्री.बी.ए.बहिरट. |
| प्रतिवादी १ तर्फे वकील | : | श्री.डी.जे.भोसले. |
| प्रतिवादी २ तर्फे वकील | : | श्री.ए.व्ही.पाटील. |

---

***: निशाण ४९ खाली आदेश :***

**(दिनांक ११ जानेवारी, २०१३ रोजी पारित केला)**

१. वादीचे कथन आहे की, दाव्यातील विषय असणारे मिळकतीचे इंदुमती गोपाळ कुलकर्णी यांनी करुन ठेवलेले मृत्युपत्राची सहीशिक्क्याची नक्कल वादीने दाखल केली आहे. वादीचे कथन आहे की, अस्सल मृत्युपत्र दिवाणी न्यायालय क.स्तर कोर्टातील रे.मु.नं.१३२/१९९० याकामी दाखल केले होते. त्या दाव्याचा निकाल दि.२०.०२.१९९५ रोजी झाला आहे. मुळ मृत्युपत्र फाईलमधून परत घेतले नसल्याने नियमाप्रमाणे नाश केले आहे. अशा परिस्थितीत अस्सल मृत्युपत्र दाखल करणे शक्य नाही. म्हणून हा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने नि.६१ वर म्हणणे दिले आहे की, मृत्युपत्र खोटे व बनावट आहे. अर्जातील मजकूर खोटा आहे. रे.मु.नं.१३२/१९९० मध्ये किंवा रेव्हेन्यू खात्यात मृत्युपत्र दाखल केले नव्हते. रे.मु.नं.१३२/१९९० दाव्यात

प्रतिवादी आप्पाजी कुलकर्णी यांना पक्षकार केलेले नसल्याने त्या दाव्याची माहिती असणे शक्य नाही. त्या दाव्यातील तडजोड हुकूमनामा हा प्रतिवादीवर बंधनकारक नाही. मृत्युपत्रावरुन वादीचे मृत्यु नोंद ०१.०९.२००५ ही रद्द झालेली आहे. तसेच वादीने या दाव्याच्यापुर्वी रे.मु.नं.४२०/२००५ चा दावा पुराव्याविरुध्द ताकिदीचा केला होता. त्या दाव्यात मृत्युपत्र दाखल केले नव्हते. तसेच त्या दाव्यातील नि.५ तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज चौकशीअंती रद्द केल्यानंतर वादीने दिवाणी अपील क्र.३६/२००७ ही रद्द झाले आहे. त्यामुळे वादीला मृत्युपत्र साबीत करणे यापूर्वी शक्य होते. परंतु मृत्युपत्र खोटे असल्यामुळे व ते अस्तित्वात नसल्याने वादीचा अर्ज रद्द व्हावा. तसेच सी. पी.सी. आदेश २ नियम २ कलम ११ ची बाधा या अर्जास नाही.

३. दोन्ही बाजुंची कथने व युक्तिवादावरुन खालील मुद्दा उपस्थित होतो. तो खालील कारणांद्वारे निर्णयास काढला आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. मृत्युपत्राचा दुय्यम पुरावा देण्यस परवानगी द्यावी काय? | **पुराव्याने सिध्द करावे.** |
| २. काय आदेश व हुकूम ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**<u>: का र ण मि मां सा :</u>**

४. **<u>मुद्दा क्र.१ :—</u>**

वादीच्या कथनावरुन स्पष्ट होते की, मुळ मृत्युपत्र अस्तित्वात नाही व दिवाणी न्यायालय क. स्तर कोर्टातील रे.मु.नं.१३२/१९९० या दाव्यात ते दाखल केले होते. या दाव्यात तडजोड हुकूमनामा झाला आहे. या दाव्यातील मुळ कागदपत्रे वादीने परत का घेतली नाहीत याबद्दल वादीने कोणतेही कारण दिले नाही.

५. प्रस्तुत दाव्यातील मुद्यांमध्ये मृत्युपत्राबाबत मुद्दा नाही.

वादीचा युक्तिवाद आहे की, या दाव्यामध्ये मृत्युपत्राआधारे वादीस हक्क प्राप्त झाल्याबाबत पुरावा वादीला देणे आहे. मुळ मृत्युपत्र कायद्याच्या प्रक्रियेने नष्ट झाले असल्याने दुयम पुरावा देणे आवश्यक आहे. प्रतिवादीच्या वकीलांनीदेखील युक्तिवाद केला आहे की, पुर्वीच्या दाव्यामध्ये मृत्युपत्र साबीत केले नव्हते. यावरुन स्पष्ट आहे की, मृत्युपत्र कायदेशीररित्या साबीत करणे अद्याप बाकी आहे. परंतु अस्सल मृत्युपत्र ज्या दाव्यात दाखल केले होते त्या दाव्यामध्ये प्रस्तुतचे वादी व प्रतिवादी पक्षकार नव्हते. त्यामुळे पुर्वीच्या दाव्यामधील अस्सल मृत्युपत्र मागण्याचा हक्क या दाव्यातील वादीस नव्हता व मुळ मृत्युपत्र या वादीने तेंव्हा दाखल केले नव्हते. या वादीचे वडील पुर्वीच्या वाटपाच्या दाव्यात प्रतिवादी होते, ही बाब तडजोड हुकूमनाम्यावरुन स्पष्ट होत आहे. वादीच्या वडीलांनी मृत्युपत्र दाखल केलेल्या दाव्यात तडजोड केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये या दाव्यामध्ये मृत्युपत्राबाबत पुरावा देणे जरुरीचे आहे का नाही ही बाब वादीच्या तोंडी पुराव्यानंतर उघडकीस येईल, असे कोर्टाचे मत आहे.

६. या दाव्यामधील मृत्युपत्र नष्ट झाले आहे याचा पुरावा वादीने देणे आवश्यक आहे. अद्याप वादीचा शपथपत्रावरील पुरावा सुरु झालेला नाही. प्रस्तुत दावा वादीच्या पुराव्यासाठी आल्यानंतर वादीने हा अर्ज केला आहे. त्यामुळे या अर्जातील मृत्युपत्र नष्ट झाल्याचे कथनाचा पुरावा वादीला दाव्यातील पुराव्यासोबत देण्याची संधी उपलब्ध आहे. मुळ मृत्युपत्र एका दाव्यात दाखल केलेले असतांना त्याबाबत दुय्यम पुरावा कायद्याने सर्वसामान्यपणे स्वीकारता येणार नाही. मृत्युपत्र सिध्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया पुराव्याच्या कायद्यामध्ये नमूद आहे.

कायदेशीर प्रक्रियेत मृत्युपत्र नष्ट केल्याचा फायदा वादी घेवू शकतो ही बाब वादीने पुराव्याने साबीत करणे गरजेचे आहे, असे कोर्टाचे मत आहे. त्यामुळे प्रतिवादींनाही या बाबीवर वादीचा उलट तपास घेण्याची संधी मिळेल व या अर्जातील मागणी गुणावगुणांवर निर्णयास काढता येईल.

वादीच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल आहे. वादीने पुढील सरतपासामध्ये या अर्जातील कथनांबाबत पुरावा द्यावा, असे कोर्टाचे मत आहे. म्हणून मुद्दा क्र. १ *'पुराव्याने सिध्द करावे.'*. सबब खालील आदेश.

***: आ दे श :***

या अर्जातील कथने वादीने दाव्यातील पुराव्यासोबत साबीत करावीत.

दिनांक : ११.०१.२०१३

(सौ.प्रिती कुमार (घुले))
**दिवाणी न्यायाधिश व.स्तर,पंढरपूर**